माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- ९३४ दिनांक :- ११/३/2023

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१४/०३/२०२३

१. अपिलकर्ता श्री नितीन मधुकर वायदंडे
४३४/२४, लहूजी शक्ती सेना,
चोरडिया बिझनेस सेंटर, सोमवार पेठ
जुनी जिल्हा परिषद बिल्डिंग शेजारी,
पुणे ४११०११.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

श्री नितीन वायदंडे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री नितीन वायदंडे यांनी दिनांक ०६/०१/२०२३ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत झाडणकामाची निविदा क्र.२६/२०२२ च्या कामाची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

सदर अर्जात विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण ६२६ पृष्ठे रक्कम रु.१२५२/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.५०७९ दि.१२/०१/२०२३ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०६/०१/२०२३ | ०५/०२/२०२३ | १२/०१/२०२३ | निरंक | १२/०१/२०२३ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – मोघम स्वरुपाची माहिती कळविले असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ११/०२/२०२३ | २९/०३/२०२३ | नाही | - | ०५/०४/२०२३ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि.११/०४/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत झाडणकामाची निविदा क्र.२६/२०२२ च्या कामाची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण ६२६ पृष्ठे रक्कम रु.१२५२/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.५०७९ दि.१२/०१/२०२३ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. |

## विवेचन

कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण ६२६ पृष्ठे रक्कम रु.१२५२/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.५०७९ दि.१२/०१/२०२३ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

सदर प्रकरणी चालनाबाबतचे पत्र विहित मुदतीत ( ७ दिवसांचे आत) पाठविले नंतरही आजतागायत अर्जदाराने इकडील कार्यालयाशी संपर्क न साधता परस्पर अपील अर्ज दाखल केला असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

## -: आदेश :-

सुनावणी कामी अपीलकर्ता अनुपस्थित असून अपिलार्थीने सदर अपील अर्ज विहित मुदतीत दाखल केलेला नसून प्रथम अपील विलंबाबाबत निवेदन सादर केलेचे दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी विहित मुदतीत चलनाबाबत अर्जदारास कळविले असल्याचे दिसून येत आहे.

सबब, माहिती अधिकार अर्जात मागणी केले नुसार अर्जदारास कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अवलोकनासाठी द्यावी, अवलोकनांती देण्या योग्य माहिती अर्जदारास १५ दिवसांचे मुदतीत द्यावी व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

Dhotre 11/4/23

(डॉ.ज्योती धोत्रे)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: ११/०४/२०२३,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. अपिलकर्ता श्री नितीन मधुकर वायदंडे
४३४/२४, लहूजी शक्ती सेना,
चोरडिया बिझनेस सेंटर, सोमवार पेठ
जुनी जिल्हा परिषद बिल्डिंग शेजारी,
पुणे ४११०११.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......